लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी चाचणी.

## परिपत्रक.

नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील निम्न श्रेणी लघुलेखकांच्या रिक्त पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्यासाठी दिनांक २७.१०.२०२० रोजी घेण्यात आलेल्या चाचणी परिक्षेत बहुतांश उमेदवारांची कामगिरी असमाधानकारक असल्याचे दिसून आल्यामुळे, केवळ सहा कर्मचाऱ्यांची तात्पूरत्या, परिविक्षाधीन स्वरुपात आणि सशर्त पदोन्नतीसाठी निवड करण्यात आली आहे.

या विभागातील निम्न श्रेणी लघुलेखकांच्या रिक्त जागांचा विचार करुन, या विभागाच्या सल्लागार समितीने पुढील दोन महिन्यांच्या कालावधीनंतर, पुन्हा इंग्रजी व मराठी लघुलेखनाची चाचणी घेण्याचा निर्णय घेतला असून, सदर चाचणीत सल्लागार समितीने ठरविलेल्या निकषांची पूर्तता करीत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार केला जाऊ शकतो.

सबब, निम्न श्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली अर्हता व पात्रता बाळगत असलेल्या उमेदवारांनी इंग्रजी व मराठी लघुलेखनाचा सराव करुन आपल्या कामगिरीत सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा.

नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील सर्व आस्थापना प्रमुख न्यायिक अधिकाऱ्यांनी प्रस्तुत परिपत्रक आपआपल्या आस्थापनेवर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :— ३१.१०.२०२०. )

(श्रीराम रा. जगताप)
**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.**

— — — — — — —

पृष्ठांकन क्र/आस्था/जिन्यापसं/४११४ /२०२०.

प्रतिलिपी,

०१ जिल्हा न्यायाधीश—१, बिलोली / कंधार / भोकर / जोड न्यायालय, मुखेड.
०२ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड / बिलोली / कंधार / भोकर / जोड न्यायालय, मुखेड
०३ मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड.
०४ सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड.
०५ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहूर / किनवट / हिमायतनगर / हदगांव / अर्धापूर / लोहा / देगलूर / नायगांव बाजार / मुदखेड / उमरी / धर्माबाद.
०६ सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भोकर / कंधार / मुखेड / बिलोली.
०७ प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
०८ सहाय्यक अधिक्षक, वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
०९ प्रस्तुत परिपत्रक जिल्हा न्यायालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द केले जावे.
१० प्रस्तुत परिपत्रक जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलक / हजेरी पटावर लावले जावे.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :— ३१.१०.२०२०. )

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.**

— — — — — — —

// कृपी रक्षति रक्षितः //